राज्यातील १०५ नगरपंचायतीमधील सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम

सत्यमेव जयते

राज्य निवडणूक आयोग

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/नप-२०२१/प्र.क्र. ६/का.६
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २४ नोव्हेंबर, २०२१

प्रति,
जिल्हाधिकारी,
ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग, पुणे,
सातारा, सांगली, सोलापूर, नाशिक, धुळे, नंदूरबार,
अहमदनगर, जळगाव, औरंगाबाद, जालना, परभणी, बीड
लातूर, उस्मानाबाद, नांदेड, हिंगोली, अमरावती, बुलढाणा,
यवतमाळ, वाशिम, नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली.

विषय :- राज्यातील माहे एप्रिल, २०२० ते माहे मे, २०२१ या कालावधीत मुदत समाप्त झालेल्या ८१ व माहे डिसेंबर, २०२१ मध्ये मुदत समाप्त होणाऱ्या १८ तसेच नवनिर्मित ६ अशा एकूण १०५ नगरपंचायतींमधील सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम २०२०-२१

संदर्भ :- १) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी सुधारणा अध्यादेश क्र ६/२०२१, दि १/१०/२०२१
२) आयोगाचे क्र. रानिआ/नप-२०२१/प्र.क्र.३/का.६, दि. ९/११/२०२१ चे पत्र
३) आयोगाचे क्र. रानिआ/नप-२०२१/प्र.क्र.३/का.६, १२/११/२०२१ चे पत्र.
४) आयोगाचे क्र. रानिआ/ग्रापंनि-२०२१/प्र.क्र.१/का.८, दि ०९/११/२०२१ चे आदेश.

महोदय / महोदया,

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पर्यवेक्षण, संचालन व नियंत्रण याची सर्व जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे.

२. सोबतच्या परिशिष्ट-२ मधील नमूद नगरपंचायतीच्या सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता प्रभाग रचना शासन राजपत्रात अंतिमरित्या प्रसिध्द झालेली असून दि. १७ नोव्हेंबर, २०२१ च्या मतदार यादीच्या कार्यक्रमानुसार अंतिम प्रभागनिहाय मतदार याद्या अधिप्रमाणित करुन दि.२९/११/२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात येणार आहेत.

३. महाराष्ट्र नगरपरिषदा,नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम,१९६५ च्या कलम ९ अ नुसार राखीव जागेवर निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने नामनिर्देशन पत्रासोबत जातप्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

४. मा. मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठात दाखल रिट याचिका क्र.१२६०७/२०२१ व्दारे राज्य शासनाने दि.१ ऑक्टोबर, २०२१ रोजी पारित केलेला महाराष्ट्र अध्यादेश क्र. ६/२०२१ ला आव्हान देण्यात आले असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. सदर प्रकरणात न्यायालयाने दि. १८ नोव्हेंबर, २०२१ रोजी दिलेल्या आदेशानुसार आयोगातर्फे करण्यात येणारी सर्व कार्यवाही ही उक्त नमूद याचिकेतील निर्णयाच्या अधीन राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

५. आता या पत्रान्वये परिशिष्ट-२ मधील नगरपंचायतींच्या सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता प्रत्यक्ष निवडणुकीचा कार्यक्रम परिशिष्ट-१ प्रमाणे जाहीर करण्यात येत आहे.

६. राज्य निवडणूक आयोगाने उमेदवाराना नामनिर्देशनपत्र व शपथपत्र सहजरितीने भरता यावे यासाठी महाऑनलाईनच्या मदतीने एक सॉफ्टवेअर तयार केलेले आहे. सर्व संभाव्य उमेदवाराने सॉफ्टवेअरद्वारेच नामनिर्देशनपत्र व शपथपत्रातील माहिती भरणे आवश्यक आहे. त्यांनी http;//panchayatelection.maharashtra.gov.in या वेबसाईटवर जाऊन त्यामध्ये स्वत:ची नोंदणी (Register) करुन घ्यावी व नामनिर्देशनपत्रामध्ये तसेच शपथपत्रामध्ये माहिती भरावी. त्यावर स्वाक्षरी करुन ते निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे विहित वेळेत व विहित पध्दतीने दाखल करावे.

अशाप्रकारे भरलेला व स्वाक्षरी केलेला नामनिर्देशनपत्राचा अर्ज नामनिर्देशनपत्र म्हणून ग्राह्य धरण्यात येईल.

७. निवडणुकीची आचारसंहिता आजपासून लागू झाली असून ती निवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यंत अंमलात राहील. वरील आचारसंहिता सार्वत्रिक निवडणूक असलेल्या संपूर्ण संबंधित नगरपंचायतीच्या क्षेत्रामध्ये लागू राहील. उपरोक्त क्षेत्रातील मतदारांवर विपरीत प्रभाव टाकणारी कोणतीही कृती / घोषणा कोणत्याही मंत्री, खासदार, आमदार, नगरसेवक किंवा इतर पदाधिकाऱ्यांना इतरत्रसुध्दा करता येणार नाही.

८. राज्यामध्ये कोरोना विषाणूची (कोविड-१९) महामारी सुरू असल्याने केंद्र व राज्य शासनाने ठरवून दिलेल्या निकषांचे तंतोतंत पालन करून नमूद नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकाचा कार्यक्रम राबवितेवेळी आवश्यक त्या उपाययोजना राबविण्यात याव्या. कोविड-१९ संदर्भात ग्रामीण व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी सर्वसामान्य मार्गदर्शक सूचना राज्य निवडणूक आयोगाने दि. १५/१२/२०२० रोजी जारी केलेल्या आहेत. सदर मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन केले जाईल याची दक्षता घ्यावी.

९. सार्वत्रिक निवडणूक असलेल्या नगरपंचायतीच्या प्रभाग रचना व मतदार यादीच्या संदर्भात न्यायालयात याचिका दाखल झाल्यास याबाबतची खातरजमा करुन न्यायालयाच्या आदेशानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील. तसेच कोणत्याही रिट याचिकेमध्ये मा. न्यायालयाचे स्थगिती आदेश प्राप्त झाल्यास निवडणूक कार्यक्रम तात्काळ रद्द / स्थगित करुन तसे आयोगास अवगत करावे.

१०. सदर निवडणूक कार्यक्रम आयोगाच्या https;//www.mahasec.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

सहपत्र- परिशिष्ट-१ व २

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत -

१) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
२) अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
३) अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव सर्व मंत्रालयीन विभाग.
४) मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
५) प्रधान सचिव (२), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
६) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७) संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
८) विभागीय आयुक्त, कोकण, पुणे, नाशिक, अमरावती व नागपूर विभाग.
९) संबंधित जिल्हा पोलीस अधिक्षक,
१०) संबंधित नगरपंचायतीचे प्रशासक व मुख्याधिकारी.
११) संचालक, शासकीय मुद्रण व लेखन सामग्रीसंचालनालय, चर्नी रोड, मंबई-४०० ००४.
१२) राज्य निवडणूक आयोगाच्या पॅनलवरील सर्व वकील
१३) उपायुक्त, संगणक कक्ष राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
१४) माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
१५) राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
१६) निवड नस्ती.



D:\MAHALE\का.६\नांदगाव खांडेश्वर नगरपंचायत.docx

# परिशिष्ट -१ सार्वत्रिक निवडणुकांसाठी

**(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ/नप-२०२१/प्र.क्र.६/का.६, दि. २४/११/२०२१ सोबतचे सहपत्र.)**

राज्यातील एकूण १०५ नगरपंचायतींच्या सोबतच्या परिशिष्ट- २ मधील नमूद सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुका-२०२१.

| अ.क्र. | निवडणूकीचा टप्पा | टप्पा सुरु करण्याची/संपविण्याची तारीख |
|---|---|---|
| १ | अंतिम प्रभागनिहाय मतदार याद्या अधिप्रमाणित करुन प्रसिध्द करण्याचा दिनांक | २९/११/२०२१ (सोमवार) |
| २ | जिल्हाधिकाऱ्यांनी निवडणूक कार्यक्रम जारी करण्याची तारीख | ३०/११/२०२१ (मंगळवार) |
| ३ | नामनिर्देशनपत्र राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या वेबसाईटवर भरण्याकरीता उपलब्ध असण्याचा कालावधी. | ०१/१२/२०२१ (बुधवार) सकाळी ११.०० ते ०७/१२/२०२१ (मंगळवार) दुपारी ०२.०० पर्यंत |
| ४ | वरील नामनिर्देशनपत्रे स्विकारण्याचा कालावधी | ०१/१२/२०२१ (बुधवार) ते ०७/१२/२०२१ (मंगळवार) (सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० पर्यंत) दि.०४/१२/२०२१ शनिवार व दि.०५/१२/२०२१ रविवार या सुट्टींच्या दिवशी नामनिर्देशनपत्र स्विकारण्यात येणार नाहीत. |
| ५ | नामनिर्देशनपत्राची छाननी व वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | ०८/१२/२०२१ (बुधवार) सकाळी ११.०० वाजल्यापासुन |
| ६ | नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याचा अंतिम दिनांक **अपील नसेल तेथे** | १३/१२/२०२१ (सोमवार) दुपारी ०३.०० वाजेपर्यंत |
| ६-अ | अपील असल्यास<br>(i) वैधरित्या नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून तीन दिवसांच्या आत, जिल्हा न्यायाधिशाकडे अपिल करता येईल.<br>(ii) निवडणूक निर्णय अधिकारी यानी अपिलाचा निर्णय लवकरात लवकर प्राप्त करुन घेण्यासाठी प्रयत्न करावेत. | अपिलाचा निर्णय ज्या तारखेस करण्यात येईल त्या तारखेनंतर तिसऱ्या दिवशी किंवा तत्पूर्वी. मात्र दिनांक १६/१२/२०२१ (गुरुवार) पर्यंत. |
| ७ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | उमेदवारी मागे घेण्यासाठीच्या शेवटच्या दिवसानंतरच्या लगतच्या दिवशी |
| ८ | आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | २१/१२/२०२१ (मंगळवार) सकाळी ७.३० पासून ते सायंकाळी ५.३० पर्यंत |
| ९ | मतमोजणी व निकाल जाहीर करण्याचा दिनांक | २२/१२/२०२१ (बुधवार) सकाळी १०.०० वाजल्यापासून |
| १० | **महाराष्ट्र शासन राजपत्रात निकाल प्रसिध्द करणे** | कलम १९ मधील तरतुदीनुसार |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

# परिशिष्ट - २

(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक रानिआ/नप-२०२१/प्र.क्र.६/का-६, दि. २४/११/२०२१ सोबतचे सहपत्र.)

| अ.क्र. | जिल्हा | अ.क्र. | नगरपंचायतींचे नावे | मुदत समाप्तीचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | ठाणे | १ | मुरबाड | २९/११/२०२० |
| | | २ | शहापूर | २९/११/२०२० |
| २ | पालघर | ३ | तलासरी | २२/१२/२०२१ |
| | | ४ | विक्रमगड | २२/१२/२०२१ |
| | | ५ | मोखाडा | २२/१२/२०२१ |
| ३ | रायगड | ६ | खालापूर | २४/०१/२०२१ |
| | | ७ | तळा | २४/०१/२०२१ |
| | | ८ | माणगाव | २४/०१/२०२१ |
| | | ९ | म्हसळा | २४/०१/२०२१ |
| | | १० | पोलादपूर | २४/०१/२०२१ |
| | | ११ | पाली (नवनिर्मित) | ३१/१२/२०२० |
| ४ | रत्नागिरी | १२ | मंडणगड | २६/११/२०२० |
| | | १३ | दापोली | २५/१२/२०२१ |
| ५ | सिंधुदुर्ग | १४ | कसई-दोडामार्ग | २३/११/२०२० |
| | | १५ | वाभवे-वैभववाडी | २३/११/२०२० |
| | | १६ | कुडाळ | ११/०५/२०२१ |
| | | १७ | देवगड-जामसंडे | २२/१२/२०२१ |
| ६ | पूणे | १८ | देहू (नवनिर्मित) | ०८/१२/२०२० |
| ७ | सातारा | १९ | लोणंद | ०३/०५/२०२१ |
| | | २० | कोरेगांव | १८/१२/२०२१ |
| | | २१ | पाटण | १८/१२/२०२१ |
| | | २२ | वडूज | १८/१२/२०२१ |
| | | २३ | खंडाळा | १८/१२/२०२१ |
| | | २४ | दहीवडी | १८/१२/२०२१ |
| ८ | सांगली | २५ | कडेगाव | २२/१२/२०२१ |
| | | २६ | खानापूर | २२/१२/२०२१ |
| | | २७ | कवठे-महाकाळ | २२/१२/२०२१ |
| ९ | सोलापूर | २८ | माढा | ०८/०५/२०२१ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | २९ | माळशिरस | ०८/०५/२०२१ |
| | | ३० | महाळुंग-श्रीपूर (नवनिर्मित) | ०९/०३/२०२१ |
| | | ३१ | वैराग (नवनिर्मित) | १९/०५/२०२१ |
| | | ३२ | नातेपुते (नवनिर्मित) | ०३/०८/२०२१ |
| १० | नाशिक | ३३ | निफाड | २९/११/२०२० |
| | | ३४ | पेठ | २९/११/२०२० |
| | | ३५ | देवळा | २९/११/२०२० |
| | | ३६ | कळवण | २९/११/२०२० |
| | | ३७ | सुरगाणा | २९/११/२०२० |
| ११ | धुळे | ३८ | साक्री | २६/११/२०२० |
| १२ | नंदुरबार | ३९ | धडगाव-वडफळ्या-रोषणमाळ | ०८/०२/२०२१ |
| १३ | अहमदनगर | ४० | अकोले | २५/११/२०२० |
| | | ४१ | कर्जत | २५/११/२०२० |
| | | ४२ | पारनेर | २५/११/२०२० |
| | | ४३ | शिर्डी | २७/१२/२०२१ |
| १४ | जळगांव | ४४ | बोदवड | २२/१२/२०२१ |
| १५ | औरंगाबाद | ४५ | सोयगांव | २६/११/२०२० |
| १६ | जालना | ४६ | बदनापूर | २३/११/२०२० |
| | | ४७ | जाफ्राबाद | २३/११/२०२० |
| | | ४८ | मंठा | २३/११/२०२० |
| | | ४९ | घनसावंगी | २३/११/२०२० |
| | | ५० | तिर्थपुरी (नवनिर्मित) | ०२/०६/२०२१ |
| १७ | परभणी | ५१ | पालम | २६/११/२०२० |
| १८ | बीड | ५२ | केज | ०१/०५/२०२० |
| | | ५३ | शिरुर-कासार | २६/११/२०२० |
| | | ५४ | वडवणी | २६/११/२०२० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | ५५ | पाटोदा | २६/११/२०२० |
| | | ५६ | आष्टी | २६/११/२०२० |
| १९ | लातूर | ५७ | जळकोट | २६/११/२०२० |
| | | ५८ | चाकुर | २६/११/२०२० |
| | | ५९ | देवणी | २६/११/२०२० |
| | | ६० | शिरुर-अनंतपाळ | २६/११/२०२० |
| २० | उस्मानाबाद | ६१ | वाशी | २४/०१/२०२१ |
| | | ६२ | लोहारा बु. | ०६/०५/२०२१ |
| २१ | नांदेड | ६३ | नायगाव | २४/०१/२०२१ |
| | | ६४ | अर्धापूर | २९/१२/२०२१ |
| | | ६५ | माहूर | २९/१२/२०२१ |
| २२ | हिंगोली | ६६ | सेनगाव | ०२/०२/२०२१ |
| | | ६७ | औंढा-नागनाथ | ०२/०२/२०२१ |
| २३ | अमरावती | ६८ | भातकुली | २९/११/२०२० |
| | | ६९ | तिवसा | २९/११/२०२० |
| २४ | बुलढाणा | ७० | संग्रामपूर | २५/११/२०२० |
| | | ७१ | मोताळा | २५/११/२०२० |
| २५ | यवतमाळ | ७२ | महागाव | २६/११/२०२० |
| | | ७३ | कळंब | २६/११/२०२० |
| | | ७४ | बाभुळगाव | २६/११/२०२० |
| | | ७५ | राळेगाव | २६/११/२०२० |
| | | ७६ | मारेगाव | २६/११/२०२० |
| | | ७७ | झरी जामणी | २६/११/२०२१ |
| २६ | वाशिम | ७८ | मानोरा | ०७/०२/२०२१ |
| २७ | नागपूर | ७९ | हिंगणा | २६/११/२०२० |
| | | ८० | कुही | २६/११/२०२० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २८ | वर्धा | ८१ | कारंजा | २९/११/२०२० |
| | | ८२ | आष्टी | २९/११/२०२० |
| | | ८३ | सेलू | २९/११/२०२० |
| | | ८४ | समुद्रपूर | २९/११/२०२० |
| २९ | भंडारा | ८५ | मोहाडी | २९/११/२०२० |
| | | ८६ | लाखनी | २९/११/२०२० |
| | | ८७ | लाखांदूर | २९/११/२०२० |
| ३० | गोंदिया | ८८ | सडकअर्जुनी | २६/११/२०२० |
| | | ८९ | अर्जुनी | २६/११/२०२० |
| | | ९० | देवरी | २६/११/२०२० |
| ३१ | चंद्रपूर | ९१ | सावली | २९/११/२०२० |
| | | ९२ | पोंभुर्णा | २९/११/२०२० |
| | | ९३ | गोंडपिपरी | २८/०२/२०२१ |
| | | ९४ | कोरपना | २८/०२/२०२१ |
| | | ९५ | जिवती | २८/०२/२०२१ |
| | | ९६ | सिंदेवाही-लोनवाही | २६/१२/२०२१ |
| | | ९७ | मुलचेरा | २५/११/२०२० |
| ३२ | गडचिरोली | ९८ | एटापल्ली | २५/११/२०२० |
| | | ९९ | कोरची | २५/११/२०२० |
| | | १०० | अहेरी | २५/११/२०२० |
| | | १०१ | चामोर्शी | २९/११/२०२० |
| | | १०२ | सिरोंचा | २९/११/२०२० |
| | | १०३ | धानोरा | २९/११/२०२० |
| | | १०४ | कुरखेडा | २९/११/२०२० |
| | | १०५ | भामरागड | २९/११/२०२० |
| | **एकूण** | | १०५ | |